


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३७१ वा शुक्रवार दि २२ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी अविनाश कोठाळेंना आता तरी अपात्र ठरवणार का?

## अमरावती विभागीय सहनिबंधकांनी कारवाईची तत्परता दाखवणे गरजेचे....

**जनसंचलन/ बुलढाणा**

आपल्या विविध प्रकारच्या भ्रष्टाचारांनी एव्हाना कुप्रसिद्ध बनलेल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लिमिटेड अमरावती या बँकेचे नेहमी चर्चेत असलेले अध्यक्ष अविनाश कोठाळे व त्यांचे काही महाभ्रष्टाचाराची चेलेचपाटे यांचा भ्रष्टाचार आता पूर्णपणे उघडा पडला असून, कोठाळे यांच्यासह बँकेतील संचालक व जबाबदार अधिकारी हे स्वतःच्या कंपन्यांना बेकायदेशीरपणे कर्जवाटप करीत असल्याचे जिल्हा उपनिबंधकांच्याच चौकशीत समोर आले आहे. त्यामुळे आता अशा गैरव्यवहार प्रकरणी खरेतर त्यांना तात्काळ अपात्र ठरवून बँकेतून बाहेर करणे गरजेचे आहे. त्यामुळे आता विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती या सर्वांना तात्काळ बरखास्त करतील हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. हा सर्व गैरव्यवहार उघड होऊन आणि जिल्हा उपनिबंधकांनी अहवाल देऊन जवळपास एक महिना लोटत आला आहे, तरीही विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी कारवाई न केल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून दैनिक जनसंचलन आणि सिटी न्यूज सातत्याने महाभ्रष्टाचारी आणि महाबेशरम असे बँकेचे अध्यक्ष बहुचर्चित अविनाश कोठाळे यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे प्रकाशात आणण्याचे काम करीत आहे. कोठाळे यांनी बँकेत गेल्या दोन-अडीच दशकांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून बँकेला डबघाईला आणण्याचे काम केलेले आहे. त्यांची अनेक प्रकरणे उघड करून देखील राज्याचा सहकार विभाग असो किंवा उपनिबंधक-सहनिबंधक कार्यालय असो सर्वजण कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसत आहे. कारण त्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड होऊन देखील अद्यापही ही सरकारी यंत्रणा ढिम्मच आहे. नवीन प्रकरण समोर आणण्याचे काम केलेल आहे ते अर्जदार स्वप्नील देशमुख यांनी. देशमुख यांचे म्हणण्यानुसार अविनाश कोठाळे हे प्राणशक्ती ट्रेड काम प्रा. लि. तसेच बुपोसे कंपनीचे संचालक आहेत. याशिवाय बँकेचे संचालक सिद्धार्थ विश्वास रायबोले आणि बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टर सरिता दुधांडे यादेखील या कंपन्यांमध्ये संचालक आहेत.खरेतर नियमानुसार अशाप्रकारे वित्तीय संस्थांचे अध्यक्ष किंवा संचालक यांना कुठल्याही दुस-या कंपन्यांमध्ये संचालक राहणे आणि त्या कंपन्यांशी बँकेचे आर्थिक देवाण-घेवाण करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. परंतु भ्रष्टाचाराला चटावलेल्या आणि बेशरमपणाचा कळस गाठलेल्या बहुचर्चित अविनाश कोठाळे यांना कसलीही नैतिकता आणि साधनशूचिता उरलेली नाही.केवळ भ्रष्टाचार करणे हाच त्यांचा धंदा बनला आहे.आता मुख्य मुद्दा असा आहे की, प्राणशक्ति ट्रेड कॉम ही कंपनी बुपोसे कंपनीची संचालक आहे.त्यामुळे या कंपन्यांना कर्जवाटपात कसलीही सवलत बँकेचे अध्यक्ष कोठाळे किंवा त्यांचे काही भ्रष्ट सहकारी देऊ शकत नाही.मात्र जिजाऊ बँकेच्या वतीने एक जाहिरात प्रकाशित करून असे सांगण्यात आले की, बँकेच्या कर्जवाटपाच्या धोरणानुसार जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेकडून अल्पदरात कर्ज घ्या व बुपोसो मार्केटिंग प्रा. लि. कंपनीकडून प्रशिक्षण घेत बाजार पेठेची हमी मिळवा.या जाहिरातीत हे आवाहन अविनाश कोठाळे व सरिता दुधांडे यांच्याकडून करण्यात आले.हे दोघेही या कंपन्यांमध्ये जबाबदार पदावर आहेत आणि दुसरीकडे बँकेतही महत्वाच्या पदांवर आहेत.या प्रकारे अविनाश कोठाळे व त्यांच्या काही सहका-यांनी धादांतपणे सहकार कायद्याचे व नियमांचे उल्लंघन केलेले आहे, हे आता अमरावती जिल्हा उपनिबंधकांच्याच चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यांनी याबाबतचा अहवाल २४ एप्रिल २०२६ रोजी म्हणजे सुमारे एक महिन्यापूर्वी विभागीय सहनिबंधक अमरावती यांना पाठवलेला आहे. खरेतर एव्हढा धादांतपणे भ्रष्टाचार उघड झाल्यानंतर कोठाळे आणि त्यांच्या काही भ्रष्टाचारी चेल्यांवर तात्काळ कारवाई होऊन त्यांना बँकेच्या संचालकपदावरून बडतर्फ करणे गरजेचे होते.मात्र, विभागीय सहनिबंधकांकडून यासंदर्भात अशी कारवाई करण्यात आलेली नाही. दैनिक जनसंचलन या माध्यमातून ही मागणी करीत आहे की,कोठाळे

सिटी न्युज & दैनिक जनसंचलन




यांची महाभ्रष्टाचारी प्रकरणे वारंवार उघड झालेली आहेत, ते अनेकदा चौकशीत दोषी आढळलेले आहेत, त्यांना तात्काळ अपात्र ठरवणे गरजेचे आहे.कोठाळे यांनी बँकेचे प्रचंड आर्थिक नुकसान केलेले आहे. त्यामुळे बँकीच आर्थिक स्थिती डबघाईला आलेली आहे. अशा स्थितीत बँकेला वाचवायचे असेल तर कोठाळे यांच्यासारखी भ्रष्टाचाराची कीड जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेतून तात्काळ घालवणे गरजेचे आहे. यासंदर्भात विभागीय सहनिबंधक यांनी तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे.जोपर्यंत कोठाळे व त्यांच्या काही भ्रष्टाचारी संचालक आणि अधिका-यांना बँकेतून बडतर्फ करण्यात येणार नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन शांत बसणार नाही. आम्ही या प्रकरणात मागील काळात ही नियमबाह्य कामांचा उलगडा समोर आणला होता.व या पुढे ही आम्ही भ्रष्टाचार विरोधात न्याय मिळेपर्यंत आमचा लढा कायम ठेवणार

# २७० क्विंटल हरभऱ्याचा घोटाळा उघड! ट्रकचालकासह टोळी जाळ्यात १८.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त;३०० फुटेज तपासून एलसीबीची धडाकेबाज कारवाई

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांचा सरकारी हमीभावाचा हरभरा लंपास करून अपहार करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात ट्रकचालकासह आरोपींना अटक करण्यात आली असून तब्बल १८ लाख ९१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मोताळा तालुक्यातील लालमाती किन्होळा येथील नाफेड खरेदी केंद्रातून १२ मे रोजी २७० क्विंटल हरभरा ट्रक क्रमांक ४३ ५२९० मध्ये भरून वखार महामंडळ, मलकापूर येथे पाठविण्यात आला होता. मात्र ट्रक चालक शेख अमीन शेख जमील याने माल वखारात न नेता परस्पर अपहार केल्याची धक्कादायक बाब समोर आली. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तब्बल ३०० सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींना मलकापूर येथे पकडण्यात आले. पोलिसांनी ११८.३५ क्विंटल हरभरा, ३ लाखांची रोकड आणि १० लाखांचा ट्रक असा एकूण १८.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास धामणगाव बढे पोलीस करत आहेत.



# ...पर्यावरण रक्षण आणि आपण...

सध्या पर्यावरणसंतुलन हा कळीचा विषय झाला आहे. पर्यावरणाच्या संतुलनासाठी प्रत्येकाने काहीतरी केले पाहिजे, पण काय हे नक्की कुणी सांगत नाही. हे काम माझे नसून कसे शासनाचे आहे, अशी सामान्यांची भावना असते, तर हरितकर वसूल करून आहे त्या गोष्टी तशाच चालू ठेवण्याकडे शासनाचा कल! इकोफ्रेंडली, निसर्गमित्र असे भारदस्त शब्द वापरले की कसे कृतकृत्य झाल्यासारखे वाटते! महानगरपालिका खूप ठिकाणी उंच खांबांवर पाट्या लावतात ङ्कनका करू वृक्ष-तोड, पृथ्वीचा होईल बिमोड.फ या पाट्या तयार करण्यासाठी किती पर्यावरणाचा नाश झाला असेल! ज्युरांग पार्क, सिंगापूर येथे एक उ द्बोधक मजकूर असलेली पाटी लावली आहे, खरोखर महाकाव्य ठरावे अशी! ङ्कजेव्हा शेवटचा वृक्ष कापला जाईल, जेव्हा शेवटचा मासा जाळ्यात सापडेल, जेव्हा शेवटची नदी विषमय होईल, तेव्हा माणसाला कळेल की पैसा खाता येत नाही!फ विकासप्रकल्प गरजेचे आहेत, यात कोणतीही शंका नाही, पण ते करताना निसर्गाचा ऱ्हास कमीतकमी कसा होईल, याचा विचार केलाच पाहिजे. मालवण येथे विकासप्रकल्प राबवायचे होते, पर्यावरणावर खूप विपरित परिणाम होणार होता, म्हणून सबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत शासनाला कल्पना दिली असता संबंधित मंत्र्यांची वल्गना आठवत असेलच तुम्हाला. ते म्हणाले होते, ङ्कआम्हाला विकास हवा आहे, तुमचे पर्यावरण समुद्रात बुडवा!फ खरे आहे, साहेबांच्या विकासासाठी हे प्रकल्प चालू होणे महत्त्वाचे होते! पर्यावरण रक्षणासाठी स्वत:पासून सुरुवात करताना आपण आपल्या वापरातील मुख्यत्वे तीन गोष्टींच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करू शकतो - प्लास्टिक, कागद, आणि ॲल्युमिनियम. या तिन्ही गोष्टी जीवनाच्या अविभाज्य गरजा ठरल्या आहेत. त्या तिन्ही आपण निसर्गातील घटकांपासून मिळवतो. या प्रक्रियेत निसर्गाचा काहीतरी ऱ्हास होणारच! बर, कोणत्याही एका वस्तूचा वापर कमी केल्यास त्याचा भार इतर दोन गोष्टींवर पडणार. ॲल्युमिनियमविषयी थोडा संभ्रम असू शकेल. रोजच्या वापरात अनेक पदार्थांची, औषधाची वेष्टने, फॉईल यासाठी ॲल्युमिनिअम वापरतात. या तीनही गोष्टींचा सम्यक वापर करणे, पुनर्वापर करणे, त्यावरील अवलंबित्व कमी करणे, हे तरी आपण करूच शकतो. नवे वृक्ष लावता नाही आले तरी आहे त्या वृक्षांची निगा राखू शकतो. एक उदाहरण- अमेरिकेत टिश्यू पेपरचा वापर इतका प्रचंड आहे की एक माणूस दर वर्षी तब्बल २५ किलो कागद वापरतो, त्यावरून उधळपट्टीची कल्पना यावी. प्लास्टिक उत्पादनाचा संबंध आपल्याशी कसा आहे, हा प्रश्न पडणे स्वाभावीक आहे. या गोष्टींचे उत्पादन करताना नक्की काय होते? तेलाच्या विहिरीतून, ङ्करिगफमधून तेल-मिश्रित चिखलच येतो. त्याला आपण ङ्कक्रूडफ ऑइल म्हणून संबोधतो. त्यावर प्रक्रिया करून पेट्रोल, डीझेल, रॉकेल, मशिनरीत वापरले जाणारे वंगण, इत्यादी तयार केले जातात. त्यासोबत जोडउत्पादन म्हणून मिथेन वायू मिळतो. त्यात कार्बन डाय ऑक्साइडपेक्षा २५ पट उष्णता धारण करण्याची क्षमता असते आणि तोच स्वयंपाकासाठी वापरला जातो तो गोबरगॅस म्हणून. याबरोबरच या प्रक्रियेत प्लास्टिक आणि इतर रसायने मिळतात. प्लास्टिक उत्पादनासाठी बाकी कोणताही पर्याय नाही. तेलविहिरी खणण्यासाठी पृथ्वीच्या पृष्ठभागापासून तीन ते पाच मैल खोल जावे लागते. कुशल मनुष्यबळ, अवजड यंत्रणा, वाहतुकीची साधने, त्यासाठी लागणारी ऊर्जा यांचा आपण कधी विचार तरी करतो का? बहुतेक तेल विहिरी वाळवंटात आहेत, पण वाळवंटे हे एक परिपूर्ण, जिवंत परिसंस्था आहेत; त्यांचा पर्यावरण रक्षणात महत्त्वाचा सहभाग आहे. खाणकाम करताना धातू किंवा क्रूड ऑइलच्या थरापर्यंत पोहोचण्याच्या आधी कोट्यवधी लिटरचा पाण्याचा थर असतो. त्याचा राक्षसी शक्तीचे पम्प लावून निचरा करावा लागतो. या सर्व पर्यावरणविघातक गोष्टींचा परिणाम कमी करण्यासाठी शासन अनेक गोष्टी करू शकते. जास्तीत जास्त इंधन मिळवणे, चांगल्या क्षमतेने चालणारी वाहने तयार करण्यास प्रोत्साहन देणे, इत्यादी. आपणही प्लास्टिकचा वापर विचारपूर्वक करणे, पुनर्वापर करणे, प्लास्टिकच्या फक्त टिकाऊ गोष्टी तयार करणे, इत्यादी. महत्त्वाचं म्हणजे प्लास्टिकची योग्य तहेने विल्हेवाट लावली पाहिजे. या गोष्टींचा विचार केल्यास प्लास्टिक सुद्धा इको-फ्रेंडली ठरू शकेल! ॲल्युमिनियम आणि कागद यांचा एकत्रित विचार करू. कागद अर्थातच वृक्षांपासून बनवतात, आणि ॲल्युमिनियम बॉक्साइट या रूपात खाणीतून मिळते. कागद निर्मितीत पाण्याचीही अतिरिक्त आवश्यकता असते. तोडलेली वृक्षसंपदा कारखान्यापर्यंत वाहून नेणे आणि कागद करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया यासाठी ऊर्जावापर होतोच. बॉक्साइट खाणींच्या उत्खननासाठी सुद्धा अवजड यंत्रणा लागते, ऊर्जा प्रचंड प्रमाणात लागते, आणि पुन्हा कारखान्यांत ते शुद्ध करण्यासाठी अतिप्रचंड प्रमाणात ऊर्जा वापरली जाते. या दोन्ही उत्पादनांमध्ये वृक्षतोड आलीच. बॉक्साइट खाणींवर असणारी जंगले अर्थातच नष्ट झाली. अनेक प्राणी, पक्षी, कीटक, आणि सूक्ष्मजीव यांचा अधिवास नष्ट झाला. नैसर्गिक आणि मोफत चालणारी वातानुकूलन यंत्रणा बंद पडली! जे वृक्ष भूगर्भजलाची पातळी राखण्यास कारणीभूत होते त्यांच्यावर गदा आली. वृक्ष आणखी एक अतिमहत्त्वाचे काम करतात. एक मोठा वृक्ष आपल्या उच्छ्वासाद्वारे प्रतिदिन १५० ते २०० लिटर पाणी वातावरणात सोडून हवेतल्या नद्या म्हणजे ङ्कएरियल रिव्हर्सफ तयार करतात! याच ङ्कनद्याफ घनता वाढल्यावर पर्जन्य तयार करतात. हेच वृक्ष प्राणवायूचेही कारखाने आहेत. याबरोबरच आपल्याला फुले-फळे यांचा अनिर्बंध पुरवठा करतात! खाणी या ङ्कओपनफ स्वरूपात असतात. त्यामुळे कडेची जमीन तापते आणि त्यातले बाष्प कमी होते. वादळ-वाऱ्यांपासून नैसर्गिक तटबंदी करणारी जंगले नष्ट झाल्यावर वादळे दूरपर्यंत घुसून उरलेल्या निसर्गसंपदेला मारक ठरतात. हा पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आपण फक्त एकच करू शकतो - वापर गरजेपुरता आणि मर्यादित करणे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'नरेंद्र मोदींना विचारण्यात आलेला प्रश्न व्हायरल होण्यासाठीच होता का?' हेले लेंग यांचं उत्तर काय?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींना नॉर्वेमध्ये एका महिला पत्रकाराने प्रश्न विचारला होता. त्यानंतर तिच्या अडचणी वाढल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या युरोप दौऱ्यावर असून युरोपातील विविध देशांना भेटी देत आहेत. नॉर्वेतील भेटीदरम्यान नॉर्वेचे पंतप्रधान जोनस स्टोर यांच्याबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत नॉर्वेच्या पत्रकार हेले लेंग स्वेन्सेन यांनी भारतीय प्रेस स्वातंत्र्याबद्दल प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. ज्यानंतर तिचं फेसबुक अकाउंट २४ तासांसाठी बंद करण्यात आलं होतं. आता हा प्रश्न व्हायरल होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना ठरवून विचारला होतास का? याबाबत पत्रकार हेले लेंग स्वेन्सेनने उत्तर दिलं आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारलेला प्रश्न हा व्हायरल होण्यासाठी विचारला होता का? असं विचारलं असता पत्रकार हेले लेंगने सांगितलं की मी पेशाने पत्रकार आहे. मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. मी माझं काम करत होते. बाकी काहीच नाही. प्रश्न उपस्थित करणं ही माझी जबाबदारी आहे, मी त्याच उद्देशातून हे केलं होतं. मला हे मान्य आहे की मी तो मुद्दा नॉर्वेच्या परराष्ट्र मंत्रालयासमोर ठेवला नव्हता, मला तिथे तो प्रश्न सुचला आणि मी तो विचारला असं त्यांनी सांगितलं. हेले लेंग यांनी एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत हे उत्तर दिलं आहे. तसंच लेंग यांना विचारण्यात आलं की तुम्हाला हे ठाऊक होतं का की ती एक मुक्त पत्रकार परिषद नव्हती. त्यावर लेंग यांनी सांगितलं की मला हे माहीत होतं की मला भविष्यात मोदींना प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे मी त्या क्षणी प्रश्न विचारला.

या मुलाखतीत लेंग यांना विचारण्यात आलं की राहुल गांधींची मुलाखत घेण्याची माझी इच्छा आहे. मी त्यासाठी त्यांना संपर्क केला आहे. जर मला राहुल गांधींची मुलाखत घेण्याची संधी मिळाली तर मी त्यांची मुलाखत नक्की घेईन. त्याचप्रमाणे भारतातील मानवाधिकार आणि माध्यमांचं स्वातंत्र्य याबाबतच्या मुद्द्यांवरही त्यांना प्रश्न विचारेन.



### मोदींच्या व्यंगचित्राबाबत काय म्हणाल्या हेले लेंग?

नॉर्वेच्या वृत्तपत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गारुड्याच्या रुपात दाखवत व्यंगचित्र छापण्यात आलं. याबाबत प्रश्न विचारला असता लेंग यांनी मौन बाळगलं आहे. मी तो लेख वाचलेला नाही. त्यामुळे असं व्यंगचित्र का वापरण्यात आलं हे मला सांगता येणार नाही. त्या व्यंगचित्रामुळे लोकांच्या भावना दुखावल्या असतील तर त्यावर चर्चा झाली पाहिजे असं लेंग यांनी सांगितलं. भारताच्या लोकशाहीबाबत तुम्हाला काय ठाऊक आहे हे विचारलं असता मी भारतात कधीही कव्हरेज केलेलं नाही किंवा रिपोर्टर म्हणून काम केलेलं नाही. मात्र भारतात प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये माहिती वाचली आहे. मला भारताच्या राजकारणापेक्षा तिथली संस्कृती तिथले खाद्यपदार्थ हे जास्त आवडतात असंही लेंग यांनी सांगितलं.

## राष्ट्रवादीच्या दोन नगरसेवकांचा भाजप प्रवेश

**सांगली/वृत्तसंस्था**

सांगली महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे दोन नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. पक्ष प्रवेशाबाबत त्यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी जनसुराज्य शयती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्या साक्षीने चर्चा केल्यानंतर त्यांनी भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला आहे.

सांगली महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तीन नगरसेवक आहेत. महापालिकेतील पक्ष प्रतोद युवराज गायकवाड आणि सुरेश बंडगर यांनी काल रात्री पालकमंत्री पाटील यांच्याशी चर्चा केली. यानंतर त्यांनी पक्ष प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या चर्चेदरम्यान, जनसुराज्यचे श्री. कदम हेही उपस्थित होते. आज सायंकाळी पक्ष प्रवेश मुंबईत प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार असून यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेणार असल्याचे श्री. गायकवाड यांनी सांगितले. याबाबत गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले, केवळ विरोधासाठी विरोध करण्याची वृत्ती ठेवली



तर प्रभागातील नागरिकांना कामे करण्याची दिलेली आश्वासने पूर्ण करता येणार नाहीत. प्रभागातील विकास कामांना गती मिळावी यासाठी आपण भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला असून भाजपच्या ध्येयधोरणाला अनुसरून आपण यापुढे कार्यरत राहणार आहे. या तीन नगरसेवकांचा स्वतंत्र गट असून महापालिकेत महाविकास आघाडी म्हणून हा पक्ष कार्यरत आहे. तीन नगरसेवकांपैकी दोघांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने आता महापालिकेत राष्ट्रवादीचे संख्याबळ केवळ एकच उरले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटातील निवडणूक जाहीर झालेली असताना नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने हा आमदार पाटील यांना राजकीय धक्का मानला जात आहे.

## राज्यातील महिलांसाठी आता जिल्हास्तरावर 'पीसीओडी क्लिनिक'; महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी ते एकात्मिक पद्धतीने उपचार

**परभणी/वृत्तसंस्था**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यभर "पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक" सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या 'पीसीओडी' समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी ही नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी ही माहिती दिली.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

'पीसीओडी' ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून त्याचा परिणाम



मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिक ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शासनाच्या आदेशानुसार दिनांक ६ मे पासून राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच महानगरपालिका रुग्णालयांमध्ये पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत. हे क्लिनिक दर बुधवारी 'मेनोपॉज ओपीडी' सोबत चालविण्यात येतील. या क्लिनिकमध्ये महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, आवश्यक वैद्यकीय तपासण्या, एकात्मिक पद्धतीने उपचार, आरोग्यविषयक समुपदेशन,आहार व जीवनशैली संदर्भातील मार्गदर्शन या सुविधा दिल्या जाणार आहेत.


ज्या रुग्णालयांमध्ये नियमित स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसतील, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा घेण्यात येणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा तसेच आयईसी विभाग यांच्यामार्फत विशेष समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती, तपासणी, निदान व उपचार यांचा नियमित अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

## "तुमची मेलडी रील हा भारतीयाचा अपमान"; रीलवर राहुल गांधींची टीका

**हेग/वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या इटलीच्या दौऱ्यावर आहेत. मोदींनी इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. या भेटीत मोदींनी मेलोनी यांना मेलडी चॉकलेट भेट दिली. या भेटीची रील सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. पण, विरोधकांकडून या रीलवर जोरदार टीकाही केली जात आहे. "पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जॉर्जिया मेलोनी यांच्याबरोबर केलेली रील हा भारतीय नागरिकांचा अपमान आहे", अशा शब्दात राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर टीका केली आहे.

मंगळवारी पंतप्रधान मोदी इटलीमध्ये दाखल झाले असून इटलीत त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं आहे. जॉर्जिया मेलोनी यांनी




मोदी यांचं स्वागत करत त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून मोदींबरोबरचा एक सेल्फी शेअर केला. मेलोनी यांची ही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. त्यानंतर मेलोनी यांनी आणखी एक पोस्ट शेअर केली यात मोदी, मेलोनी यांना मेलडी चॉकलेट्सचा पुडा गिफ्ट दिल्याचं दिसत आहे. या व्हिडीओ देखील तुफान व्हायरल झाला. यावरुन राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली आहे. "भारतात आर्थिक वादळ येत आहे. तेल, पेट्रोल, डिझेल आणि विमानासाठी लागणाऱ्या इंधनाचे भाव गगनाला भिडतील. खतांची कमतरता भासू लागेल, खतांचे भाव वाढतील, शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. अर्थव्यवस्थेला मोठा झटका बसणार आहे. पंतप्रधानांनी सांगितले की सोने खरेदी करु नका, अधिक प्रमाणात वाहन चालवू नका आणि विदेशात जाऊ नका. आणि नंतर विदेशात जाऊन, हजारो, कोट्यवधींच्या विमानातून विदेशात जाऊन तिथं इटलीच्या पंतप्रधान मेलोनींना मेलडी चॉकलेट खाऊ घालत आहेत. हा भारतीय जनतेचा अपमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बनवलेली रील हा भारतीय नागरिकांचा अपमान आहे", अशा शब्दात राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर टीका केली.

राहुल गांधींनी नरेंद्र मोदींच्या या कृतीला नौटंकी असल्याची टीका देखील सकाळी व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर केली. "देश आर्थिक संकटात आहे आणि पंतप्रधान मोदी इटलीत चॉकलेट्स वाटत आहेत. हे नेतृत्व नाही, तर नौटंकी आहे", अशा शब्दांत राहुल गांधी यांनी हल्लाबोल केला आहे. "देश आर्थिक संकटात आहे आणि आपले पंतप्रधान इटलीमध्ये चॉकलेट्स वाटत आहेत. एकीकडे शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि छोटे व्यावसायिक आक्रोश करत आहेत. मात्र, दुसरीकडे पंतप्रधान मोदी हे हासत आहेत आणि रिल्स बनवत आहेत, त्यावर भाजपा टाळ्या वाजवत आहे. हे नेतृत्व नाही, तर नौटंकी आहे", अशी टीका राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमधून केली आहे.

# पुणे पोलिसांनी उत्तराखंडमध्ये जावून बिश्नोई गँगच्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या

**चिंचवड/वृत्तसंस्था**



पिंपरी-चिंचवड शहरात खळबळ उडवून देणाऱ्या रावेत येथील 'AJ' फर्निचर मॉल गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी कुख्यात आरजू बिश्नोई आणि कुलदीप कशिश गँगशी संबंधित तिघांना पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुंडाविरोधी पथकाने उत्तराखंडमधून अटक केली आहे. १५ मे रोजी रात्री नऊच्या सुमारास दोन अज्ञात आरोपींनी रावेत येथील 'AJ' फर्निचर मॉलवर तब्बल आठ राउंड फायरिंग केली होती. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गोळीबारानंतर आरोपी महाराष्ट्राबाहेर फरार झाले होते.या प्रकरणाचा तपास करताना गुंडाविरोधी पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे आरोपींचा माग काढला. पोलिसांनी इंदोर, चंदीगड आणि हरिद्वार येथे पाठलाग करत अखेर उत्तराखंडमध्ये तिघांना जेरबंद केले. प्रवीण रामनिवास पंकज, कुलदीप राठी आणि सागर अजय पाल अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी आरोपींकडून महत्त्वाची माहिती मिळवली असून या प्रकरणामागील संपूर्ण कटाचा तपास सुरू आहे.दरम्यान, रावेत येथील 'AJ' फर्निचर मॉलच्या मालकांकडे दोन कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. मात्र खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने मॉलवर गोळीबार केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांना मोठे यश मिळाले असून शहरातील गुन्हेगारी टोळ्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. ही कारवाई गुंडाविरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.पोलिसांनी आरोपींना पकडण्याआधी आरोपींनी फेसबुक पोस्ट करत धमकी दिली होती. "हा तर फक्त ट्रेलर आहे. पुढच्यावेळी थेट गोळी डोक्यात घालू", अशा इशारा फेसबुक पोस्टच्या माध्यमातून देण्यात आला होता. बिश्नोई गँगचा सदस्य असल्याचा दावा करणाऱ्या शुभम लोणकर याच्या अकाउंटला टॅग करुन याबाबतची धमकी देण्यात आली होती. आरोपींच्या या कृत्याची गंभीर दखल पोलिसांनी घेतली होती. पोलिसांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने लोकेशन ट्रॅक करत आरोपींचा पाठलाग केला. यानंतर योग्य वेळी आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

बिश्नोई गँगने अशाप्रकारे दहशत माजवण्याचा प्रयत्न केल्याची ही पहिली घटना नाही. याआधीदेखील अशाप्रकारच्या घटना घडल्या आहेत. अभिनेता सलमान खान यालादेखील अनेकदा बिश्नोई गँगकडून टार्गेट करण्यात आलं आहे. बिश्नोई गँगने सलमान खानला जीवे मारण्याची अनेकदा धमकी दिली आहे. तसेच सलमान खानच्या वांद्र्यातील घरावर गोळीबार केल्याचीदेखील घटना घडली होती. एवढंच नाही तर आरोपींनी सलमानच्या पनवेल येथील फॉर्म हाऊसच्या बाहेरही रेकी केल्याची माहिती त्यावेळी समोर आली होती.

## रायगडकरांना 'टोलमाफी' नाहीच!

**अलिबाग/वृत्तसंस्था**




मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा टोलनाका सुरू झाल्यानंतर, रायगड जिल्ह्यातील एमएच-०६ आणि एमएच-४६ पासिंगच्या वाहनांना टोलमाफी दिल्याबाबत मोठा गाजावाजा करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात टोलनाक्यावर या वाहनांकडून सर्रास टोल वसूल केला जात आहे. त्यामुळे रायगडकरांची दिशाभूल झाल्याचा आरोप होत आहे. याबाबत सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही मौन बाळगल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. खारपाडा टोलनाका शुक्रवारपासून कार्यान्वित करण्यात आला. स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी या टोलविरोधात आक्रमक भूमिका घेत आंदोलन केले होते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या आंदोलनानंतर रायगड जिल्ह्यातील एमएच-०६ नोंदणीकृत वाहनांना टोलमाफी देण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे स्थानिकांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र हा दिलासा अल्पायुषी ठरला.प्रत्यक्षात टोलनाक्याच्या व्यवस्थापनाने स्पष्टीकरण देत, ही सवलत रायगडमधील सर्व वाहनांना नसून केवळ पेण आणि पनवेल शहर परिसरापुरती मर्यादित असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे 'रायगडकरांना टोलमाफी' ही घोषणा केवळ जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठीच होती का, असा सवाल संतप्त नागरिक करत आहेत.गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर या टप्प्याचे काम तब्बल १६ वर्षांपासून रखडलेले आहे. अनेक ठिकाणी सेवा रस्ते अपूर्ण आहेत. ड्रेनेज व्यवस्था नाही, उड्डाणपुलांची कामेदेखील रखडली आहेत. रामवाडी येथील वाशी नाका परिसरात वडखळकडे जाणारा मार्ग बंद असल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडावा लागत आहे. इंदापूर आणि माणगाव येथील वाहतूककोंडीमुळे प्रवाशांचा खोळंबा होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.महामार्गाच्या कामात इतक्या गंभीर त्रुटी असतानाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोलवसुली सुरू केल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

## पुण्यात टोळीसंघर्ष धोकादायक वळणावर, पोलिसांच्या रेकॉर्डवर सापडायला नको, आंदेकर टोळीची चलाख युक्ती

**पुणे/वृत्तसंस्था**





वनराज आंदेकरच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आंदेकर टोळीने बुधवारी सकाळी सातारा रस्त्यावर बालाजीनगर परिसरात रिक्षाचालक तरुणावर जीवघेणा हल्ला केला. हल्लेखोरांनी गोळीबार आणि कोयत्याने वार करून खूनाचा प्रयत्न केला. एक गोळी तरुणाच्या मांडीत लागली, तर डोक्यात कोयत्याचे तीन ते चार गंभीर घाव झाले. यात तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेतअक्षय ऊर्फ बाळा बापू म्हस्के (२६) असे जखमी तरुणाचे नाव आहे. अक्षय रिक्षाचालक असून, त्याचा भाऊ आकाश म्हस्के हा वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी आहे. वनराजच्या खूनापूर्वी उत्तर प्रदेशातून पिस्तूल आणण्यात आकाशची भूमिका असल्याचे समोर आले होते. आंदेकर टोळीने आरोपींच्या नातेवाइकांवर हल्ल्याचा इशारा दिल्याची चर्चा होती.दरम्यान, पुणे शहरातील टोळीसंघर्ष अधिकच धोकादायक वळणावर पोहोचला असून, आंदेकर टोळीकडून खून आणि खूनाच्या प्रयत्नांसाठी नवीन मुलांचा वापर केला जात असल्याचे तपासातून समोर येत आहे. गुन्हेगारीशी थेट संबंध नसलेल्या, पोलिसांच्या रेकॉर्डवर नसलेल्या तरुणांकडून हल्ले घडवून आणले जात असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.एक सप्टेंबर २०२४ रोजी सोमनाथ गायकवाड टोळीने गोळीबार आणि कोयत्याने हल्ला करून वनराज आंदेकरचा खून केला होता. या घटनेनंतर आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकरने खुनाचा बदला घेण्याची शपथ घेतल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर खून व खुनाच्या प्रयत्नांची मालिका सुरू झाली.सूत्रांच्या माहितीनुसार, वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपींच्या नातेवाइकांनाच लक्ष्य केले जात आहे. संबंधितांना सतर्क राहण्याचा इशारा पुणे पोलिसांनी दिला असला, तरी अचानक नवीन मुलांकडून हल्ले होत असल्याने आरोपींच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आयुष कोमकर आणि गणेश काळे यांच्या खुनानंतर काही नातेवाइकांनी पुणे सोडल्याची माहितीही समोर आली आहे.आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर, कृष्णा आंदेकर आणि टोळीतील इतर सदस्य सध्या 'मकोका'अंतर्गत कारागृहात आहेत. आंदेकर टोळीवर खुनाचे दोन आणि खंडणीचा एक असे तीन मकोका गुन्हे दाखल आहेत. मात्र, कारागृहात असतानाही बाहेर खून आणि खुनाचे प्रयत्न घडवून आणले जात असल्याने पोलिसांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.वनराज आंदेकर खून प्रकरणात पुणे पोलिसांनी आतापर्यंत २१ जणांना अटक केली आहे. प्रत्यक्ष हल्लेखोर; तसेच त्यांना मदत करणाऱ्यांचा त्यात समावेश आहे. या प्रकरणात आकाश म्हस्के, समीर काळे, आबा खोंड आणि संगम वाघमारे यांना पिस्तूल पुरवल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघात; स्कोडा कारचा चक्काचूर, दोघांचा मृत्यू

**लोणावळा/वृत्तसंस्था**




मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कोडा कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला. स्कोडा कार दोन्ही मार्गाच्या मधील लोखंडी दुभाजकाला जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, लोखंडी दुभाजकाचा जाड पत्रा तुटून तो कारच्या आरपार गेल्याने या भीषण अपघातात पुण्यातील दोन वृद्धांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात बुधवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बौर गावच्या हद्दीत झाला आहे.जयदीप गोडे (वय -६१), किशन उत्तम चंदाने (वय -७५, दोघेही रा. उंडरी, पुणे) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे असून, संजय मेवाला (वय-६१, रा. उंडरी, पुणे) हे जखमी झाले आहेत.वडगाव महामार्गाचे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक सुनील अवसरमोल यांनी दिलेल्या माहितीनुसार, जयदीप गोडे आणि किशन चंदाने हे त्यांच्या स्कोडा कारने (क्रमांक - एमएच -१२/पीएच -७४२७) मुंबईला काही कामानिमित्त गेले होते. ते मुंबईतील काम उरकून पुन्हा माघारी पुण्याला चालले होते. मुंबई पुणे एक्सप्रेस वेवरील कामशेत बोगदा सोडल्यानंतर काही अंतरावर भरधाव वेगात जाणाऱ्या स्कोडा कार चालकाचे नियंत्रण सुटून कार दोन्ही मार्गा मधील लोखंडी दुभाजकाला जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, या भीषण धडकेत लोखंडी दुभाजकाचा जाड पत्रा तुटला आणि हा पत्रा कारच्या आरपार गेला.अपघाताची माहिती मिळताच वडगाव महामार्गाचे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक सुनील अवसरमोल, पोलिस उपनिरीक्षक शिंदे व कामशेत पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आकाश पवार यांनी सहकाऱ्यांसह तसेच देवदूत आपत्कालीन पथक, डेल्टा फोर्सच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी करून युद्धपातळीवर कारमध्ये अडकलेल्यांना बाहेर काढले. तसंच जखमीला उपचारासाठी सोमाटणे फाटा येथील पवना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांनंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहन बाजूला करून मार्ग वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास कामशेत पोलीस करत आहेत.

# वैभव, बिहार क्रिकेटचा वनवास आणि नवी भरारी

**मुंबई, वृत्तसंस्था :**

डेरेदार वडाच्या झाडाखाली आजोबा बसले आहेत. तुम्ही ताजपूरमधल्या सगळ्यात प्रसिद्ध माणसाचा पत्ता विचारल्यावर ते हसतात आणि हाताने खूण करतात. तो पत्ता असतो वैभव सूर्यवंशीचा. १५व्या वर्षी आयपीएल स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या गोलंदाजांना तो बुकलून काढतो आहे. 'एकेकाळी सुपरस्टार मुंबई दिल्लीतच दिसायचे. आता मोठ्या शहरातली माणसं वैभवला शोधत आमच्या गावात येतात. छोट्या ताजपूरचा मोठा हिरो', असं ते अभिमानाने सांगतात.

ताजपूरपासून १८० किलोमीटरवर गोपाळगंज आहे. या गावात राहणारे मोहम्मद अन्सारी घराबाहेर भाजक्या उन्हात उभे असतात. त्यांच्या शेजारी एका उदयोन्मुख नायकाचं घर आहे. ते शेजारी आहेत आयपीएल स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या साकीब हुसेनचे. सनरायझर्स हैदराबादसाठी पदार्पण करणाऱ्या साकीबने आपल्या वेग आणि अचूकतेने सगळ्यांना प्रभावित केलं आहे. 'आधी आमच्या गावात फार कुणी येत नसे. नातेवाईक मंडळी, निवडणुकीच्या वेळेला राजकारणी एवढाच राबता असे. कधीमध्ये निमशहरातला एखादा उद्योगपती चक्कर टाकत असे. बाकी आमच्या गावात सामसूम असे. पण आता साकीबचं घर पाहायला लोक येतात. शक्य झाल्यास त्याच्या घरच्यांबरोबर सेल्फिही काढतात'. वैभवप्रमाणेच साकीबलाही टोपणनाव मिळालं आहे. गोपाळगंजचा रबाडा! दक्षिण आफ्रिकेचा प्रसिद्ध वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाप्रमाणे शैली असल्यामुळे साकीबला हे नाव मिळालं आहे.

फक्त या भागातून जाणारे येणारे नव्हे तर पारखी नजरेचे आयपीएल संघांचे टॅलेंट स्काऊट्सही परिसरावर लक्ष ठेऊन असतात. कुठे हिरा मिळेल काही सांगता येत नाही. वैभवला तर वंडरकिंड अशी बिरुदावली मिळाली




आहे. बेसबॉलपटूप्रमाणे चेंडूला भिरकावून देणारा वैभव धावांच्या चळती रचतो आहे, विक्रमांचे इमले उभारतो आहे. या दोघांच्या बरोबरीने कोलकाता नाईट रायडर्सचा अनुकूल रॉय, दिल्ली कॅपिटल्सचा मुकेश कुमार आणि सनरायझर्स हैदराबादचा इशान किशन. या सगळ्यांना जोडणारा एक समान धागा आहे. तो म्हणजे बिहार. हे सगळे बिहारचे आहेत. आयपीएल बहरत असताना बिहार क्रिकेट संघटना अस्तित्वातच नव्हती. तरीही या राज्यातले पाच खेळाडू आयपीएल गाजवत आहेत.

ताजपूर आणि गोपाळगंज. या दोन्ही गावांमध्ये काही साम्य नाही. एकमेकांपासून बऱ्याच अंतरावरही आहेत. दोन्ही ठिकाणची भाषा वेगळी आणि स्थानिक अर्थकारण वेगळं आहे. ताजपूरहून गोपाळगंजला जाणं ही एक शिकवणच आहे. कशा पद्धतीने बिहार क्रिकेटने मजल दरमजल करत वाटचाल केली आहे याचं हे प्रतीकात्मक उदाहरण आहे.

१५ वर्षांसाठी म्हणजे २००३ ते २०१८ या कालावधीत बिहार क्रिकेट संघटनेवर गैरव्यवहार आणि अंतर्गत बंडाळ्या यामुळे बंदी घालण्यात आली होती. राज्य क्रिकेट संघटनाच रद्दबातल झाल्यामुळे त्यामुळे अनेक गुणी क्रिकेटपटू अन्य राज्यात गेले. काहींनी क्रिकेट खेळणंच सोडून दिलं. शतक उंबरठा ओलांडत असताना पाटण्यात लहानाचा मोठा झालेला इशान किशन झारखंडला गेला. पुढे जाऊन झारखंड संघाचा कर्णधार झाला. गोपाळगंजचाच मुकेश कुमार आणि डेहरी गावचा आकाश दीप बंगालला रवाना झाले. अनुकूलनेही झारखंडची वाट धरली. या सगळ्यांनी बिहारमधल्या युवा क्रिकेटपटूंसाठी एक पथदर्शक वाट तयार केली. बिहार आणि झारखंड दोन्ही राज्यांसाठी खेळलेले आणि महेंद्रसिंग धोनीचे पहिले कर्णधार सुनील कुमीर सांगतात, 'महेंद्रसिंग धोनीने झारखंडसाठी काय केलं ते आपल्या सगळ्यांसमोर आहे. झारखंड बिहारमधून वेगळं झाल्यानंतर धोनीच्या रुपात या राज्याला पोस्टरबॉय लाभला. झारखंड आताच्या घडीला देशातल्या अव्वल संघांपैकी एक आहे. इशान, वैभव, साकीब हे सगळे मूळचे बिहारचेच आहेत. त्यांच्यामुळे नव्या क्रिकेटपटूंना प्रेरणा मिळेल. डोमेस्टिक स्पर्धांमध्ये ते खेळतील. आयपीएल स्पर्धेपर्यंत पोहोचावं असं त्यांना वाटेल. त्यांना आता बिहार सोडायची गरज नाही'.

बिहारसंदर्भात दिल्ली किंवा मुंबईला जाणारी स्थलांतरित मंडळी हेच चित्र कायमस्वरुपी झालं होतं. दर अर्ध्या तासाला रेल्वेच्या जनरल डब्यात कोंबून घेत हजारो लोक बिहारहून दिल्ली-मुंबईच्या दिशेने रवाना होतात. वैभवचे वडीलही असेच मुंबईला गेले होते. त्यावेळी बिहार म्हणजे जंगलराज, खंडणीखोर असंच चित्र झालं होतं. बिहार तेव्हा अनागोंदी आणि उद्रेकाच्या उंबरठ्यावर होतं. पण आता वैभव आणि साकिबच्या दमदार वाटचालीमुळे बिहारमध्ये गुणवान प्रतिभाशाली क्रिकेटपटू आहेत याची जाणीव देशवासीयांना झाली आहे. 'क्रिकेटच्या बाबतीत बिहार म्हणजे निद्रिस्त पेटारा आहे', असं सुनील कुमार सांगतात. 'येत्या काही वर्षात बिहार क्रिकेटची ताकद देशाला दिसून येईल', असं बिहार क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष आणि भाजपाचे खजिनदार राकेश कुमार तिवारी यांनी सांगितलं. त्यांचा २५ वर्षांचा मुलगा हर्षवर्धन आता संघटनेचं काम बघतो. बिहारमध्ये राजकारण आणि दारुबंदी यांच्याइतकीच आता वैभव सूर्यवंशी आणि साकीबची चर्चा होते. फोनवर आयपीएलचा सामना सुरू असतो. गुळाचा चहा आणि लिट्टीच्या बरोबरीने गप्पा सुरू राहतात. बिहारमधल्या रेल्वे स्थानकांवर आणि विमानतळावर रामायणातली चित्रं अर्थात म्यूरल्स मांडण्यात आली आहेत. मधुबनी शैलीतली ही चित्रं पाहुण्यांचं लक्ष वेधून घेतात. रामायणातला संदर्भ आताच्या काळाशी जोडला जातो. बिहार क्रिकेट संघटनेवर १५ वर्षांची बंदी होती. जसा रामाला वनवास भोगावा लागला तसं बिहार क्रिकेट संघटनेलाही असं म्हटलं जातं.

## आर्सेनलला दोन दशकांनी मिळाले प्रीमियर लीगचे जेतेपद





**चेपॉक/वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील बलाढ्य आर्सेनल फुटबॉल क्लबची प्रीमियर लीग जेतेपदाची २२ वर्षांपासूनची प्रतीक्षा अखेर संपली. प्रीमियर लीगमध्ये मंगळवारी रात्री झालेल्या सामन्यात विजय अनिवार्य असताना मँचेस्टर सिटीला बॉर्नमथविरुद्ध १-१ अशी बरोबरीच नोंदवता आली. त्यामुळे आर्सेनलचे २००३-०४ हंगामानंतरचे पहिले इंग्लिश प्रीमियर लीग जेतेपद निश्चित झाले.

माजी प्रशिक्षक आर्सन वेंगर यांच्या कार्यकाळाच्या अखेरीस आर्सेनलला निराशेचा सामना करावा लागला होता. त्यानंतर उनाइ एमरी यांनाही आर्सेनलला यश मिळवून देता आले नाही. आर्सेनलने २०१९ मध्ये याआधी 'मॅनेजर' म्हणून काम करण्याचा अनुभव नसलेल्या मिकेल आर्टेटा यांच्याकडे संघाची जबाबदारी सोपवली. सुरुवातीला त्यांनाही संघर्ष करावा लागला. गेल्या तीन हंगामांत आर्सेनलला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. यंदाच्या हंगामातील आता एक सामना शिल्लक असताना आर्सेनलचे ८२ गुण झाले असून मँचेस्टर सिटीच्या खात्यावर ७८ गुण आहेत. त्यामुळे सिटीने अखेरचा सामना जिंकून तीन गुण मिळवले आणि आर्सेनलने आपला सामना गमावला, तरी सिटीचा संघ गुणतालिकेत आर्सेनलला गाठू शकणार नाही. मँचेस्टर सिटीने एप्रिलमध्ये झालेल्या सामन्यात आर्सेनलवर विजय मिळवत जेतेपदाच्या आशा पल्लवित केल्या होत्या. मात्र, त्यानंतर सिटीला कामगिरीत सातत्य राखता आले नाही. आर्सेनलने यानंतरचे चारही सामने जिंकले, तर सिटीला पाचपैकी दोन सामन्यांत बरोबरीवर समाधान मानावे लागले. त्यामुळेच सिटीचा संघ गुणतालिकेत आर्सेनलपेक्षा मागे पडला.आर्सेनलच्या जेतेपदात त्यांचा भक्कम बचाव निर्णायक ठरला. आर्सेनलने प्रीमियर लीगच्या या हंगामात ३७ पैकी १९ सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांना एकही गोल करू दिला नाही.

## कोलकाताचा मुंबई इंडियन्सवर सहज विजय!

**मुंबई/वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने घरच्या मैदानावर मुंबई इंडियन्सचा ४ विकेट्सने सहज पराभव केला. मुंबईविरूद्धच्या या विजयानंतर केकेआरचे प्लेऑफ गाठण्याची शक्यता अधिक वाढली आहे. कोलकाताचा संघ आता पंजाब किंग्सच्या बरोबरीत आला असून दोन्ही संघांचे ६-६ गुण आहेत. याशिवाय केकेआरचा रन रेटदेखील आता प्लसमध्ये आला आहे. त्यामुळे केकेआरला स्पर्धेतील अखेरचा सामना जिंकत प्लेऑफमध्ये जाण्याची सुवर्णसंधी आहे.

अंगक्रिश रघुवंशीच्या जागी कन्कशन सबस्टिट्यूट तेजस्वी दहिया या अनकॅप्ड खेळाडूला खेळण्याची संधी मिळाली. तेजस्वी दहियाला विकेटकिपिंगनंतर फलंदाजीची संधी मिळाली. संघाला ३० चेंडूत ३० धावांची गरज असताना तो फलंदाजीला आला आणि दुसऱ्या चेंडूवर त्याच्या ग्लोव्हजची कड घेत चेंडू चौकारासाठी गेला. मुंबईने दिलेल्या १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरला पहिल्याच षटकात धक्का बसला. दीपक चहरने फिन एलनला क्लीन बोल्ड करत मुंबईला मोठी विकेट मिळवून दिली. अंगक्रिश रघुवंशीला दुखापत झाल्याने तो पहिल्या डावात मैदानाबाहेर गेला होता. त्यामुळे मनिष पांडे तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणे २१ धावा करत बाद झाला. तर कॅमेरून ग्रीन ४ धावांवर माघारी परतला. ग्रीननंतर आलेल्या रोव्हमन पॉवेलने पहिल्याच चेंडूवर षटकार मारत आपले मनसुबे जाहीर केले. मुंबईने तयार केलेला सर्व दबाव पॉवेलने आपल्या एकापेक्षा एक चौकारांनी कमी केला. ज्याला मनिष पांडेने चांगली साथ दिली. पॉवेलला झेलबाद करण्याची मोठी संधी होती. पण दीपक चहर व रॉबिन मिंज यांनी एकमेकांकडे पाहत हा झेल सोडून दिला. ज्याचा मुंबईला चांगलाच फटका बसला. मनिष पांडे ६ चौकारांसह ४५ धावांची खेळी करत बुमराहच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला.



## बांगलादेशच्या विजयाचा भारताला मोठा धक्का

**मुंबई/वृत्तसंस्था**

बांगलादेश संघाने पाकिस्तानचा कसोटी मालिकेत २-०च्या फरकाने दारूण पराभव केला आहे. बांगलादेशला या विजयानंतर गुणतालिकेत मोठं बक्षीस मिळालं आहे. बांगलादेशने मायदेशात खेळल्या गेलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत पाकिस्तानला केवळ व्हाईटवॉशच दिला नाही, तर भारतीय संघालाही मोठा धक्का देत त्यांना जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत खाली ढकललं आहे.

पाकिस्तानवर बांगलादेशच्या विजयानंतर भारतीय संघ सहाव्या स्थानावर घसरला आहे. या चक्रात आतापर्यंत खेळलेल्या नऊ कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघाने ४८.१५ टक्के गुण मिळवले असून, त्यात चार विजय, चार पराभव आणि एका अनिर्णित सामन्याचा समावेश आहे. दरम्यान, पाकिस्तानला पराभूत केल्यानंतर बांगलादेशने चार कसोटी सामन्यांमध्ये ५८.३३ टक्के गुणांसह पाचवे स्थान पटकावले आहे, ज्यात दोन विजय, एक पराभव आणि एका अनिर्णित सामन्याचा समावेश आहे.

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध एक कसोटी सामना खेळणार आहे. मात्र, हा सामना जागतिक कसोटी स्पर्धेचा (WTC) भाग असणार नाही. त्यामुळे, श्रीलंका दौऱ्यावरील दोन कसोटी सामन्यांची मालिका जिंकून भारताला WTC गुणतालिकेतील आपलं स्थान सुधारण्याची संधी असणार आहे. या संधीचा फायदा घेत भारताला अंतिम सामना खेळण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत. बांगलादेशने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत निर्भेळ मालिका विजय मिळवून केवळ पाकिस्तान आणि भारतालाच धक्का दिला नाही, तर इंग्लंड आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांनाही मागे टाकलं आहे. थोडक्यात सांगायचं तर बांगलादेश आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेत चार संघांच्या पुढे आहे. आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५-२०२७ च्या गुणतालिकेत ऑस्ट्रेलिया सध्या ८४.५० च्या टक्केवारीसह पहिल्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलिया आणि दुसऱ्या क्रमांकावरील न्यूझीलंड (७७.७८ टक्के) यांच्यामध्ये मोठं अंतर आहे.

# धुरंधर ' मुळे सुरक्षा धोक्यात! सैनिकाकडूनच याचिका दाखल, गुपित दाखवलं, हायकोर्टाचे तपासणीचे आदेश

एका जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच सेन्सॉर बोर्डाला 'धुरंधर' या चित्रपटातील काही सीन्स संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंतेचा विचार करावा आणि त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा असे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्याने उपस्थित केलेले मुद्दे 'विचारात घेण्यासारखे' आहेत आणि त्यांचे 'योग्य प्रकारे निवारण होणे' आवश्यक असल्याचे न्यायालयाचे म्हणणे आहे.आदित्य धर दिग्दर्शित आणि रणवीर सिंहची मुख्य भूमिका असलेल्या 'धुरंधर' चित्रपटाविरोधात एका लष्करी जवानानेच याचिका दाखल केली होती. ते स्वतः न्यायालयात उपस्थित राहिले होते. या चित्रपटामध्ये काही अशी सीन्स आहेत, जी लष्कर आणि सुरक्षा दलांद्वारे वापरल्या जाणाऱ्या रणनीती, कार्यपद्धती तसेच काही संवेदनशील ठिकाणे अत्यंत स्पष्टपणे दर्शवतात; ज्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होतो असा युक्तिवाद त्यांनी केला. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, जरी या चित्रपटाला 'काल्पनिक कथा' म्हणून संबोधले जात असले, तरीही अशा प्रकारचे चित्रण देशाची सुरक्षेच्या हिताचे मानले जाऊ शकत नाही; उलट, ते देशाच्या सुरक्षेसाठीच एक प्रकारे धोका ठरते.सुनावणीदरम्यान, न्यायालयाने आपले



मत नोंदवले की, चित्रपटांचा प्रभाव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसतो. यावेळी त्यांनी एक उदाहरण देत म्हटले की जर एखाद्या चित्रपटात जीव देण्याच्या पद्धती ऑनलाइन शोधण्यासारखे सीन अत्यंत तपशीलवारपणे चित्रित केले गेले, तर अशा सीन्समागे काही 'उद्देश' आहे का, हा प्रश्न निर्माण होतो. चित्रपटांचा प्रभाव नाकारता येत नाही, आणि नेमक्या याच कारणामुळे सेन्सॉरशिप आणि मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता असते.याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयाकडे धाव घेत म्हटले की, 23 मार्च 2026 रोजी त्यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच सेन्सॉर बोर्डाकडे एक सविस्तर निवेदन सादर केले होते; ज्यामध्ये चित्रपटातील काही सीन्सबाबत आक्षेप नोंदवलेले. याचिकाकर्त्याने पुढे असेही नमूद केले की, या मुद्द्यासंदर्भात त्यांनी सर्वोच्च न्यायालयातही एक याचिका दाखल केली होती. आपल्या आदेशात, न्यायालयाने संबंधित सक्षम प्राधिकरणाला निर्देश दिले की, त्यांनी या याचिकेला एक 'औपचारिक निवेदन' म्हणून ग्राह्य धरावे, संपूर्ण प्रकरणाची छाननी करावी आणि आवश्यक वाटल्यास 'सुधारात्मक उपाययोजना' कराव्यात. शिवाय, या संदर्भात जो निर्णय घेतला जाईल, तो याचिकाकर्त्याला कळवला जावा.धुरंधर' हा चित्रपट डिसेंबर 2025 मध्ये प्रदर्शित झाला; त्याने जगभरात एकूण 1,307.35 कोटींची कमाई केली, तर भारतात 840.20 कोटींचा गल्ला जमवला. त्याचा पुढील भाग 'धुरंधर 2' 18 मार्च 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने भारतात एकूण 1,371,95 कोटी आणि निव्वळ 1,146.35 कोटींची कमाई केली आहे. जगभरात, या चित्रपटाने एकूण 1,798.62 कोटींची कमाई केली आहे. धुरंधर 2' हा चित्रपट अधिकृतपणे OTT प्लॅटफॉर्म्सवर प्रदर्शित झाला असला, तरीही बॉक्स ऑफिसवरील त्याची कमाई अजूनही सुरूच आहे. आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी हा चित्रपट 14-15 मे रोजी 'नेटफ्लिक्स' या OTT प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला असला, तरी आता 4 जूनपासून भारतीय प्रेक्षकांसाठी तो 'Jio Hotstar' वर प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे, प्रेक्षकांना या चित्रपटाची एक 'मूळ आणि यापूर्वी कधीही न पाहिलेली' आवृत्ती पाहता येईल.

# करण कुंद्राचं तेजस्वी प्रकाशला फिल्मी स्टाईल प्रपोज, जोडप्यानं ऑनस्क्रीन उरकला साखरपुडा

करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश ही सर्वात लोकप्रिय टीव्ही जोडप्यांपैकी एक आहेत. चाहत्यांना त्यांची केमिस्ट्री खूप आवडते. हे जोडपं त्यांच्या लग्नामुळेही चर्चेत आहे. आता, करण आणि तेजस्वीचे चाहते ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण अखेर आला आहे. चार वर्षांच्या डेटिंगनंतर, करण कुंद्रानं तेजस्वी प्रकाशला प्रपोज केलं असून त्यांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. नेटफ्लिक्सच्या 'देसी ब्लिंग' या रिऍलिटी शोच्या शेवटच्या एपिसोडमध्ये, करण कुंद्रानं तेजस्वी प्रकाशला रोमँटिक प्रपोज केलं. करण कुंद्रानं शोच्या शेवटच्या एपिसोडमध्ये तेजस्वीसाठी एक खास सरप्राईज प्लॅन केलं होते. या खास प्रसंगासाठी अनेक कलाकारही उपस्थित होते. जेव्हा तेजस्वी तिथे पोहोचली आणि तिनं मोठी सजावट पाहिली आणि तिला सुखद धक्का बसला.स्विमिंग पूलमध्ये 'माझ्याशी लग्न करशील का?' असं लिहिलं होतं. हे पाहून अभिनेत्री तेजस्वी खूप भावुक झाली. करणने गुडघ्यावर



बसून एका मोठ्या हिऱ्याच्या अंगठीसह तिला प्रपोज केलं. तेजस्वीचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि तिनं अभिनेत्याला होकार दिला. या जोडप्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यांचे चाहते या व्हिडिओंवर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. या शोमध्ये त्यांच्या नात्याची अनेकदा परीक्षा झाली आहे. जेव्हा त्यांच्यात भांडणं झाली असे अनेक क्षण आले. पण या खऱ्या आयुष्यात तेजस्वी आणि करण यांचं प्रेम कधीच कमी झालं नाही. छोट्या पडद्यावर साखरपुडा केल्यानंतर आता हे जोडपं लग्न कधी करणार, याकडे चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे.दरम्यान, करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश २०२१ पासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांची भेट 'बिग बॉस १५' मध्ये झाली आणि तेव्हापासून ते एकत्र आहेत. सध्या, करण आणि तेजस्वी 'लाफ्टर शेफ' या रिॲलिटी शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये दिसत आहेत.

# 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेतून पूर्वाची एग्झिट

लोकप्रिय मालिका वीण दोघांतली ही तुटेना या मालिकेत एक नवे रंजक वळण आले होते. मालिकेत समरची मैत्रीण किमया आल्यामुळे कथानकात मोठी उलथापालथ झाली होती. प्रसिद्ध अभिनेत्री पूर्वा गोखले हिने मालिकेत किमयाची भूमिका साकारली होती. पण, आता या मालिकेत मोठा ट्वीस्ट घेऊन आलेली किमया मालिकेतून एग्झिट घेणार आहे.

किमयाच्या येण्यामुळे स्वानंदीला समरवर असलेल्या प्रेमाची जाणीव होते. एका पार्टीत दारू पिऊन स्वानंदी समरसमोर तिच्या मनातील भावना, प्रेम भडाभडा बोलून टाकते. पण, इथेही ट्वीस्ट आहेच. समरला वाटते स्वानंदी दारू प्यायली, त्यामुळे बडबडते आणि तो तिच्या बोलण्यावर अजिबात विश्वास ठेवत नाही. पण आताच कुठे एन्ट्री घेतलेली अभिनेत्री लगेचच एग्झिट घेत असल्यामुळे चाहते कोड्यात पडले आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री पूर्वा गोखले हिने 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेत एन्ट्री घेतली आणि चाहत्यांच्या आनंदाला पारावारच उरला नाही. किमया हे केवळ एक नवे पात्र नसून ती समरची जुनी मैत्रीण आणि त्याची एक्स गर्लफ्रेंड. परदेशातून भारतात परतल्यानंतर ती थेट समरच्या घरी राहायला येते, ज्यामुळे घरातील




वातावरण आणि नात्यांची समीकरणे पूर्णपणे बदलून जातात. पण, आता हीच किमया मालिकेतून एग्झिट घेणार आहे. स्वतः पूर्वा गोखले हिने याबाबत पोस्ट करुन माहिती दिली आहे.

पूर्वा गोखले हिने तिच्या सोशल मिडिया अकाऊंटवर याबाबत एक खास पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट करत तिने आपण मालिकेतून एग्झिट घेत असल्याचे सांगितले आहे. खरंतर पूर्वाची मालिकेत पाहुणी कलाकार म्हणून एन्ट्री झालेली. त्यामुळे काहीच एपिसोडसाठी आलेली किमया आता मालिकेतून एग्झिट घेणार आहे. 'वीण दोघांतली ही तुटेना' या मालिकेच्या सेटवर केक कापून सेलिब्रेशन सुद्धा करण्यात आले. दरम्यान, पूर्वाने तिच्या पोस्टमध्ये सेटवरचे काही न पाहिलेले फोटोसुद्धा पोस्ट केले आहेत.

# लग्न झाल्यामुळे सिनेमासाठी नाकारलं; मराठी अभिनेत्रीनं सांगितला प्रसंग, म्हणाली, 'माझ्यासाठी सरप्रायजिंग'

इंडस्ट्रीमध्ये अनेक कलाकारांना वेगवेगळ्या कारणास्तव नकाराचा सामना करावा लागतो. त्याबद्दल कलाकार मुलाखतींमध्ये भाष्यही करतात. अशातच आता मराठी अभिनेत्री पायल जाधवनंही तिला मिळालेल्या नाकाराबद्दल सांगितलं आहे. लग्न झाल्यामुळे अभिनेत्रीला सिनेमासाठी नकार देण्यात आला, असं तिनं सांगितलंय.मराठी अभिनेत्री पायल जाधवनं अनेक मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. पायल सोशल मीडियावर तिच्या प्रोफेशनल आयुष्याबद्दल अपडेट्स देत असते. मात्र, वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवण्याचा अभिनेत्रीचा प्रयत्न असतो. पायल जाधवच्या लग्नाला सहा वर्षे झाली असून तिचा नवरा आयटी क्षेत्रात नोकरीला आहे. पायल सोशल मीडियावर नवऱ्यासोबतचे फोटो जास्त शेअर करत नसल्यामुळे अनेकांना तिच्या लग्नाबद्दल माहिती नाही. त्यामुळे एकदा पायलचं लग्न झालंय हे समजल्यामुळे अभिनेत्रीला सिनेमासाठी नकार देण्यात आला.इट्स मज्जा'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये पायलला लग्न सगळ्यांसमोर रिव्हील न करणं हे ठरवलेलं आहे की, त्याचा परिणाम कामावर झालाय?' असं विचारलं असता अभिनेत्री म्हणाली की, 'खूपच विचित्र अनुभव होता. सिनेमाची संपूर्ण कथा ऐकली आणि त्यात इंटिमेट सीन्स होते. मला सिनेमाची स्क्रिप्ट आवडली आणि मी होकार दिला.'बोलता-बोलता मी म्हटलं मुंबईत नवऱ्यासोबत राहते. त्यावेळी त्यांनी सांगितलं की, तुझं लग्न झालंय त्यामुळे तू हा सिनेमा नाही करू शकत. मलाही तेव्हा काय प्रतिक्रिया द्यायची हे समजत नव्हतं. माझ्यासाठी सरप्रायजिंग होतं. मला लोक सांगायचे, लग्नाबद्दल फार बोलू नकोस. पण माझा हा विचारच नव्हता. माझ्या नवऱ्याची इच्छा आहे का? तो माझा नवरा आहे हे लोकांना सांगावं का? तर आता त्याला असं नाही वाटत अजिबात' असं पायलने पुढे सांगितलं.दरम्यान, पायल जाधवच्या कामाबद्दल सांगायचं तर सध्या अभिनेत्री झी मराठी वाहिनीवरील 'तारिणी' या मालिकेत झळकत आहे. या मालिकेमध्ये पायलने हरप्रीत चड्ढाची भूमिका साकारली आहे. पायलच्या भूमिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसादही मिळतोय. त्याचबरोबर पायलने यापूर्वी 'अबीर गुलाल', 'मानवत मार्डर्स' यांसारख्या मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध; अफवांवर विश्वास ठेऊ नये

## नागरिकांनी आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करा- पालकमंत्री मकरंद पाटील यांचे आवाहन

जनसंचलन बुलढाणा

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून नागरिकांनी इंधन टंचाईबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले आहे.
गेल्या काही दिवसांपासून इंधन तुटवड्याच्या अफवामुळे जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर गर्दी होत असून अनावश्यक इंधन साठा जमा करताना दिसून येत आहे. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा समाधानकारक साठा उपलब्ध असून पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत असल्याने नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी टाळावी. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, यामुळे सर्वांना इंधनाचा पुरवठा सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे.
जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या आणि पेट्रोल पंप धारकांच्या सतत संपर्कात आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचे वाटप सुरळीत व्हावे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.
जिल्ह्यात आज (दि. २१ मे) विविध ऑईल कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात इंधनाचा पुरवठा झाला आहे. यामध्ये कडून १ लाख २ हजार ५०० लिटर पेट्रोल आणि ३ लाख ५ हजार ५०० लिटर डिझेल, कडून १ लाख ५ हजार लिटर पेट्रोल आणि ३ लाख ७४ हजार लिटर डिझेल, तर कडून ६ लाख ८० हजार लिटर पेट्रोल आणि ७ लाख २५ हजार लिटर डिझेलचा पुरवठा करण्यात आला आहे. सध्या जिल्ह्यात एकूण ८ लाख ८७ हजार ५०० लिटर पेट्रोल आणि १४ लाख ४ हजार ५०० लिटर डिझेल उपलब्ध असून दररोज नव्याने इंधनसाठा प्राप्त होत आहे.
गॅस सिलेंडरबाबतही जिल्ह्यात कोणतीही कमतरता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमचे नियमित ४ लाख ६३ हजार ४९४ ग्राहक असून उज्वला योजनेंतर्गत २ लाख ५ हजार ७१५ ग्राहकांना सेवा दिली जात आहे. दररोज सुमारे ७ हजार ९५० गॅस सिलेंडर ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात येत असून १६ हजार ४४८ सिलेंडरचा साठा राखीव आहे. कंपन्यांकडून दररोज याच पद्धतीने इंधनाचा पुरवठा होणार असल्याचे पुरवठा शाखेने सांगितले आहे.
शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी आवश्यक तेवढे इंधन उपलब्ध करून दिले जाईल. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिकांनी इंधनाचे साठेबाजी करू नये तसेच पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले आहे.

# मत्स्यकास्तकार, शेतकरी, सहकारी संस्था यांनी मत्स्यबीजाची मागणी नोंदवा

जनसंचलन बुलढाणा

सन २०२६-२७ । आर्थिक वर्षाचा भारतीय प्रमुख कार्प जातीच्या अर्थात कटला, रोहू, मृगळ माशांचा पावसाळी प्रजनन हंगाम जूलै २०२६ पासून सुरु होत आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे मत्स्यबीज उत्पादन केंद्र, कोराडी, ता. मेहकर जि. बुलढाणा येथे १५ जुलैपासून सुरु करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मत्स्यकास्तकार, शेतकरी व सहकारी संस्थांनी मत्स्यबीजाची मागणी लेखीस्वरुपात नोंदवावी, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी केले आहे.
जिल्ह्यातील भूजलाशयीन मच्छिमारी सहकारी संस्था, जिल्हा मच्छिमार सहकारी संस्थांचा संघ, मत्स्यकास्तकार, शेततळीधारक तसेच पाटबंधारे विभागाचे तलाव, जलाशय आणि जिल्हा परिषदेकडील सिंचन व पाझर तलाव मासेमारी ठेक्याने घेतलेल्या संस्थांनी शासनाच्या धोरणानुसार अपेक्षित प्रमाणात मत्स्यबोटूकली संचयन करणे बंधनकारक असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाने स्पष्ट केले आहे. विभागामार्फत प्रमुख कार्प, रोहू, कटला, सायप्रिनस, पंगेशियस तसेच गिफ्ट तिलापिया या प्रजातींचे मत्स्यजिरे, मत्स्यबीज, बोटूकली आणि प्रगत बोटूकली विविध दराने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. सर्व मच्छिमारी सहकारी संस्था आणि मत्स्यकास्तकारांनी फक्त शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्रातूनच बीज खरेदी करणे बंधनकारक आहे. बीज खरेदीची पावती जवळ ठेवणे आवश्यक असून, ती कोणत्याही शासकीय योजनेच्या लाभासाठी आवश्यक मानली जाणार आहे. बाहेरून, इतर जिल्हा किंवा राज्यातून, खाजगी मार्गाने बीज खरेदीसाठी जिल्हा कार्यालयाची पूर्व परवानगी अनिवार्य आहे. विनापरवानगी बीज खरेदी आढळून आल्यास शासन धोरणानुसार कारवाई केली जाईल. मत्स्यबीज संचयनाचे पंचनामे करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय शासकीय योजनांचा लाभ घेणे कठीण होऊ शकते.
त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी आपल्या शेततळ्यातील किंवा तलावातील संचयनासाठी लागणाऱ्या मत्स्यजिरेची मागणी लेखी स्वरुपात सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), प्रशासकीय इमारत, बस स्थानकासमोर, बुलढाणा येथे त्वरीत नोंदवावी. अधिक माहितीसाठी उत्कर्ष चाचरकर, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा (८६६८२६७०८८), नि. मा.साळुंके सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी मत्स्यबीज केंद्र कोराडी (८६६९०७२७६८) या मोबाईल क्रमांकावर किंवा कार्यालयाच्या दूरध्वनी ०७२६२-२४२२५४ क्रमांकावर संपर्क साधावा. मत्स्य उत्पादन वाढीसाठी हे बीज संचयन अत्यंत उपयुक्त ठरणार असून, सर्वांनी यामध्ये सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागातर्फे करण्यात आले आहे.

# दिव्यांग मुला-मुलींसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरु; ३० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत शासनमान्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, ता. देगलुर, जि. नांदेड येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दिव्यांग मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी १८ ते ४० वयोगटातील अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध व मतिमंद दिव्यांग विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, इलेक्ट्रिक डोमेस्टिक उपकरणे दुरुस्ती व सर्व्हिसिंग, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग (), कॉम्प्युटर अकाउंटिंग व ऑफिस ऑटोमेशन तसेच अगरबत्ती, खडू व धूपनिर्मिती यांसारखे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
इच्छुक दिव्यांग विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांनी दि. ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर, जि. नांदेड येथे अर्ज पाठवावेत किंवा समक्ष भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड येथे किंवा मो.क्रमांकावर ९९६०९००३६९ / ९४०३२०७१०० / ७३७८६४११३६ संपर्क साधावा.

# माझं गाव, आरोग्य संपन्न गावफअभियान; कसं काय? मोहिमेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/बुलढाणा

राज्य शासनाच्या ङ्क्षमाझं गाव, आरोग्य संपन्न गावफ्र अभियानांतर्गत जनजागृतीसाठी सुरू करण्यात आलेल्या कसं काय मोहिमेला बुलढाणा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आला. यावेळी कसं काय ?फ्रया जनजागृतीपर गीताचे तसेच विशेष पोस्टर्सचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, प्रधान सचिव निपुण विनायक तसेच मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. ग्रामीण महाराष्ट्रात आरोग्य जागृतीची नवी चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न या मोहिमेद्वारे करण्यात येत असून गावागावांत आता कसं काय ?फ्रहा प्रश्न आरोग्य जनजागृतीचा संदेश देत आहे.
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या पुढाकारातून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. या माध्यमातून स्वच्छता, पोषण, निरोगी जीवनशैली, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा तसेच आरोग्य सक्षमीकरण याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. कसं काय या विशेष गीताच्या माध्यमातून आरोग्यविषयक संदेश आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने



नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत गावागावांत या मोहिमेची व्यापक प्रसिद्धी केली जात आहे. विविध आरोग्य शिबिरे, ग्रामसभा, जनजागृती कार्यक्रम तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान ग्रामीण भाग अधिक निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदायी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असून बुलढाणा जिल्हा या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत आहे.

# चिखलीत पाणीपुरवठ्याचा बोजवारा; कचऱ्याने शहर गुदमरलं!

## महाविकास आघाडीचा नगरपरिषदेला इशारा; प्रश्न न सुटल्यास तीव्र आंदोलनाचा एल्गार

जनसंचलन चिखली

शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता व्यवस्थापनाचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचा गंभीर आरोप करत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरले आहे. याबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत नागरिकांच्या आरोग्याशी सुरू असलेला खेळ तात्काळ थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदनात म्हटले आहे की, शहरात सुरू असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेचा कंत्राटदार अत्यंत निष्काळजीपणे काम करत असून जुन्या पाइपलाइनद्वारे होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. काही भागात चार दिवसांनी तर काही ठिकाणी तब्बल पाच दिवसांनी पाणी मिळत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. उन्हाळ्याच्या तडाख्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी



लागत असल्याने प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दुसरीकडे शहरातील कचरा व्यवस्थापनही पूर्णपणे कोलमडले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक कचरा गाड्या नादुरुस्त असून कंत्राटी सफाई कर्मचारी केवळ कागदोपत्री काम करत असल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला. शहरातील नालेसफाई नियमित होत नसल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे. महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आलेल्या या निवेदनावर डॉ. प्रकाश शिंगणे, आनंद बोहे, उवेद अली खान, रणदीप शिनगारे यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जागतिक मधमाशी दिनानिमित्त बुलढाण्याच्या राजेंद्रदास बैरागी यांना राज्यस्तरीय मधुमीत्र पुरस्कार

जनसंचलन/बुलढाणा

जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा राज्यस्तरीय ङ्गमधुमीत्रफ पुरस्कार धाड (ता. जि. बुलढाणा) येथील मध उत्पादक व मधुपालक राजेंद्रदास प्रकाश बैरागी यांना प्रदान करण्यात आला. मध उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, दीर्घ अनुभव, मध उत्पादन, मधमाशांच्या वसाहतींचे संवर्धन, प्रशिक्षण तसेच संशोधनात्मक योगदान या निकषांच्या आधारे निवड समितीमार्फत त्यांची निवड करण्यात आली. हा पुरस्कार २० मे २०२६ रोजी संत एकनाथ रंगमंदिर, क्रांती चौक, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते बैरागी यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य सभापती (राज्यमंत्री दर्जा) रविंद्रजी साठे, लक्ष्मण अधिकारी, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) राजकुमार डांगर, उप मुख्य अधिकारी (उद्योग) नित्यानंद पाटील, मध संचालक महाबळेश्वरचे रघुनाथ नारायनकर तसेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बुलढाणा संजय इंगळे तसेच सर्व जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, कर्मचारी, मधनिरीक्षक, मधुपालक व मध उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजेंद्रदास बैरागी यांच्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून जिल्ह्यातील मध उद्योग क्षेत्राला नवी प्रेरणा मिळाली आहे.

# अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

पोलीस स्टेशन, बुलढाणा ग्रामीण परिसरातील अनोळखी मृत व्यक्ती हा अंदाजे ५० वर्षीय पुरुष असून तो दिव्य प्रकल्प आश्रम, वरवंड येथे वास्तव्यास होता. संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला असून दिव्य सेवा प्रकल्प आश्रमाचे संचालक अशोक काकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार मृत व्यक्ती अनोळखी व बेवारस असल्याचे सांगण्यात आले आहे. त्याचा पत्ता दिव्या फाऊंडेशन, वरवंड, ता. जि. बुलढाणा असा नमूद करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशन येथे मर्ग क्रमांक २५/२०२६ कलम १९४ भा.ना.सु.सं. अंतर्गत अनोळखी मृत व्यक्तीची नोंद करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. कक्षसेवक यांच्या रिपोर्टवरून ही कारवाई करण्यात आली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवून त्याच्या नातेवाईकांचा शोध लागावा यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. संबंधित व्यक्तीबाबत कोणास काही माहिती असल्यास तपासी अधिकारी पोहेकॉ कैलास ऊगले ८८८८८११७१४ / ८८३०२६५२१४ यांच्याशी संपर्क साधावा.


# पिक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत अन्नधान्य पिके, भरडधान्य (मका), पौष्टिक तृणधान्य (श्री अन्न) तसेच कडधान्य आत्मनिर्भर अभियान सन २०२६-२७ अंतर्गत पिक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पीक प्रात्यक्षिक गटांचे अर्ज तसेच प्रमाणित बियाणे वितरणासाठी शेतकऱ्यांनी महा-डीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मका, पौष्टिक तृणधान्य, तूर, मुग व उडीद या पिकांसाठी इच्छुक शेतकरी बांधवांनी ... या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावेत. ङ्गप्रथम येणाऱ्यास



प्रथम प्राधान्यफ या तत्वावर अर्ज स्वीकृत करण्यात येणार असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८